मा. अति. महा. आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :- १/१७७
दिनांक :- ०१/०६/२०२१

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-०५.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ 2990
दिनांक :- 01/06/2021

– आ ज्ञा प त्र –

विषय:- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील उद्यान सेवा संवर्गातील "उद्यान निरीक्षक" वर्ग-३ या पदावरून "सहाय्यक उद्यान अधिक्षक" वर्ग-२ या वरिष्ठ पदावर तदर्थ पदोन्नतीने नेमणूकीबाबत.

संदर्भ:- १) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/५१,दि. ०१/०६/२०२१
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठ.क्र.१/१७६ दि. ०१/०६/२०२१

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील उद्यान सेवा संवर्गातील "उद्यान निरीक्षक" वर्ग-३ या पदावरून "सहाय्यक उद्यान अधिक्षक" वर्ग-२ (वे.श्रे.रू. ९३००-३४८०० + ग्रेड पे ४४०० + मान्य भत्ते) या पदावर बढतीने नेमणुका करण्यात येतात. संदर्भ क्र. १ व २ चे मान्यतेस अनुसरून खालील सेवकाची बढतीने तदर्थ नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवकाचे नाव व जातीचा प्रवर्ग | नेमणुकीचा गट | सध्याचे खाते | तदर्थ पदोन्नतीने नेमणुकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती हरपळे स्नेहल एकनाथ (खुला) | जेष्ठतेनुसार | उद्यान विभाग | उद्यान विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |

१) उपरोक्त पदोन्नती ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे २०२१ चे अधिन राहून करण्यात येत आहे.

२) उपरोक्त सेवकाची "सहाय्यक उद्यान अधिक्षक" पदावरील तदर्थ पदोन्नती मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (अ) | सदर सेवकाविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही. |
| (ब) | या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी/सेवकाला नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. |
| (क) | मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. |

३) मे.राज्य शासनाच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालय पदोन्नतीमधिल आरक्षणाबाबत जो काही निर्णय देईल त्यानुसार मागासप्रवर्गातील सेवकांच्या पदोन्नतीमधिल आरक्षणाबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, या निर्णयाच्या अधिन राहून वरील सेवकाची तदर्थ पदोन्नती करण्यात येत आहे.

४) वरील सेवकाने आज्ञापत्र हाच कार्यमुक्ती आदेश समजून संबंधित खात्यात त्वरीत रूजू व्हावे व रूजू झालेबाबतचे निवेदन इकडील कार्यालयाकडे सादर करावे.

५) संबंधित सेवकास मनपा सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

६) या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकाच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

७) वरील सेवकांचे नेमणुकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्म दिनांक, अनुभव इ. बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य आढळुन आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतुन कमी

करण्यात येईल.

८) निवड झालेल्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शविल्यास "पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम व त्याबाबत अवलंबण्याची कार्यवाही" याविषयी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.३०३/का.१२ दि.१२/०९/२०१६ मधील तरतुदी विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

९) या आज्ञापत्रातील उपरोक्त अटी व शर्ती, वरील सेवकावर बंधनकारक राहतील.

वरील सर्व अटी व शर्तींची काटेकोरपणे कार्यवाही करणेविषयी खातेप्रमुख यांनी दक्षता घ्यावी. तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरुर ती पुढील कार्यवाही करावी.

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका.

**प्रत - संबंधित मा. खातेप्रमुख,**
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . . . .